आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१८ ऑगस्ट २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- जागतिक आव्हानांचा सामना एकजुटीनं करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विकसनशील देशांना आवाहन

- संरक्षण मंत्री राजनाथ सिंह चेन्नई इथं भारतीय तटरक्षक दलाच्या सागरी बचाव समन्वय केंद्राचं उद्घाटन करणार

- वैद्यकीय सेवा क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांवरचे हल्ले रोखण्यासाठी कायदा करण्याची भारतीय वैद्यकीय संस्थेची प्रधानमंत्र्यांना पत्र लिहून मागणी

**आणि**

- २६/११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा संशयित तहव्वुर राणाच्या भारतात प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा

**<><><><><>**

अनिश्चितता, युद्ध, रोगराई अशा जागतिक आव्हानांचा सामना विकसनशील देशांनी एकजुटीनं करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. व्हॉईस ऑफ ग्लोबल साऊथ संघटनेच्या शिखर बैठकीत ते काल बोलत होते. दूरस्थ पद्धतीनं ही बैठक झाली; याचं यजमानपद भारताकडे होतं. हवामान बदल, आरोग्य, खाद्य आणि ऊर्जा सुरक्षेचा सामना या देशांना करावा लागतो आहे. दहशतवाद, कट्टरतावाद आणि फुटीरतावाद हे देखील समाजासाठी धोकादायक असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. व्यापार आणि दळणवळणाला प्रोत्साहन, शाश्वत विकास उद्दिष्ट आणि महिलांचा विकास प्रक्रियेत वाढता सहभाग याविषयी भारत वचनबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज चेन्नई इथं भारतीय तटरक्षक दलाच्या सागरी बचाव समन्वय केंद्राचं उद्घाटन करणार आहेत. तसंच ते चेन्नईतल्या सागरी प्रदूषण प्रतिसाद केंद्राचं आणि पुद्दुचेरीतल्या कोस्ट गार्ड एअर एन्क्लेव्हचंही उद्घाटन करतील. सागरी सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत कार्यक्षम मदत मिळण्यासाठी हे केंद्र महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज अहमदाबाद इथल्या एका कार्यक्रमात १८८ हिंदू निर्वासितांना नागरिकत्व सुरक्षा कायद्यांतर्गत नागरिकत्व प्रमाणपत्रांचं वाटप केलं. या कायद्यात नागरिकत्व काढून घेण्याची नाही, तर नागरिकत्व देण्याची तरतूद आहे, असं प्रतिपादन त्यांनी या कार्यक्रमात बोलताना केलं. याशिवाय अमित शहा १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांच्या अहमदाबाद महापालिकेच्या विविध विकास कामांचं उद्घाटनही करतील. त्यानंतर ते साबरमती इथं पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत.

**<><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आज कुवेतमध्ये दाखल झाले. कुवेतचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्दुल्लाह अली अल याह्या यांनी त्यांचं स्वागत केलं. या भेटीदरम्यान, जयशंकर कुवेतच्या राष्ट्रप्रमुखांचीही भेट घेण्याची शक्यता आहे. या दौऱ्यात उभय देशातल्या राजकीय, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, सुरक्षा, संस्कृती तसंच दूतावास आणि लोकसंपर्क यासह द्वीपक्षीय संबधांच्या विविध पैलूंचा आढावा घेतला जाईल. मध्यपूर्व आणि दक्षिण आशियातल्या भूराजकीय परिस्थितीसह उभय देशाच्या हिताच्या मुद्द्यांवरही या दौऱ्यात वैचारिक आदानप्रदान होणार आहे.

**<><><><>**

नेपाळच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. आरजू राणा देउबा या पाच दिवसीय दौऱ्यासाठी आज भारतात येत आहेत. नेपाळ हा भारताचा अतिशय महत्वाचा भागीदार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. या दौऱ्यात उभय देश एकमेकांना करत असलेल्या सहकार्याचा आढावा घेतला जाणार आहे. उभय देशांचे परराष्ट्र व्यवहार मंत्री नेपाळ-भारत

संबंध मजबूत करण्याच्या आणि सहकार्याला चालना देण्याच्या उद्देशानं चर्चा करतील, असं नेपाळच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कोलकात्याच्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणी भारतीय वैद्यकीय संघटनेनं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून आरोग्य सेवा क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी कायदा करण्याची विनंती केली आहे. सर्व रुग्णालयांमध्ये सुरक्षेसंबंधीचे नियम विमानतळांवरच्या नियमांइतके कठोर करावेत, सर्व रुग्णालयं सुरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करावी आणि योग्य ती सुरक्षाव्यवस्था त्यांना पुरवली जावी, असंही या पत्रात म्हटलं आहे. बलात्कार आणि हत्या प्रकरणाची चौकशी सखोल आणि ठराविक वेळेत पूर्ण व्हावी, तसंच पीडित डॉक्टरच्या कुटुंबीयांना योग्य नुकसानभरपाई दिली जावी, डॉक्टरांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुधारण्याच्या दिशेने प्रयत्न व्हावेत, अशा मागण्या भारती वैद्यकीय संघटनेनं प्रधानमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात केल्या आहेत.

**<><><><><>**

कोलकात्याच्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग संशयित आरोपी संजय रॉय याची मानसशास्त्रीय चाचणी आज घेणार आहे. दिल्लीच्या केंद्रीय न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेच्या विश्लेषकांचं एक पथक कोलकात्याला पोहोचल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान, केंद्रीय अन्वेषण विभागानं काल सलग दुसऱ्या दिवशी आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे माजी मुख्याध्यापक डॉ. सुदीप घोष यांची प्रदीर्घ चौकशी केली.

आरोग्य सुविधा क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या सुरक्षितेसाठी आवश्यक त्या उपाययोजना सुचवण्याच्या दृष्टीनं एक समिती स्थापन करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. यासंदर्भात राज्य सरकारांनीही समितीला आपापल्या सूचना द्याव्यात, असं सरकारनं म्हटलं आहे.

दरम्यान, कोलकाता पोलिसांनी आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या आवारात आजपासून सात दिवस भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत जमावबंदी लागू केली आहे.

**<><><><><>**

२६/११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा संशयित तहव्वुर राणा याला भारतात पाठवण्याची परवानगी अमेरिकेच्या एका न्यायालयानं दिली आहे. भारत-अमेरिका प्रत्यार्पण कराराअंतर्गत राणाला भारताच्या ताब्यात देणं शक्य असल्याचा निर्वाळा न्यायालयानं दिला. भारतात पाठवण्याच्या हालचालींच्या विरोधात राणानं न्यायालयात धाव घेतली होती. सध्या तो याच प्रकरणात लॉस अँजेलिसच्या कारागृहात आहे. लष्कर-ए-तैय्यबाचा दहशतवादी डेव्हिड हेडली आणि पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आयएसआयशी संबंधित असल्याचा आरोपही तहव्वुर राणावर आहे.

**<><><><><>**

देशातल्या पाळीव जनावरांचं २०३० पर्यंत लसीकरण करून त्यांना तोंड तसंच खुरांना होणाऱ्या 'लाळ्या खुरकुत' आजारापासून मुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या उपायोजनांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय मत्सपालन, पशुपालन आणि दुग्धविकासमंत्री राजीव रंजन सिंह यांनी बैठक घेतली. शेतकरी तसंच भारतीय अर्थव्यवस्थेसाठी पशुधन महत्त्वाचं असल्याचं ते म्हणाले.

या योजनेअंतर्गंत केलेल्या सर्वेक्षणात कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगणा, उत्तराखंड, पंजाब,हरियाणा, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांना एफएमडी मुक्त करण्यासाठी प्राधान्य दिलं जाणार आहे. जनावरांना होणाऱ्या एफएमडी या आजारामुळे दरवर्षी सुमारे २४ हजार कोटी रुपयांचं आर्थिक नुकसान होतं. हे नुकसान टाळण्यासाठी देशाला एफएमडी मुक्त करण्याचं उद्दिष्ट्य सरकारनं ठेवलं असल्याचं सिंह यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबई विमानतळावर अवैधरित्या साडे चार किलो सोनं घेऊन आलेल्या दोघांना महसूल गुप्तचर संचालनालयानं अटक केली. या सोन्याची किंमत ३ कोटी ३३ लाख रुपये आहे. या

दोन्ही व्यक्ती अबूधाबी इथून मुंबईत आल्या होत्या. त्यांची तपासणी केली असता विशिष्ट पद्धतीनं शिवलेल्या जॅकेटच्या खिशांमध्ये हे सोनं आढळून आलं.

**<><><><>**

उत्तर विभागाचे लेफ्टनंट जनरल एम. व्ही. सुचिंद्र कुमार यांनी जम्मू काश्मीर खोऱ्यातल्या सुरक्षेचा आढावा घेतला. यावेळी त्यांना राज्यातली सुरक्षा व्यवस्था आणि अमरनाथ यात्रेला जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी लष्करानं केलेल्या तयारीची माहिती देण्यात आली. लेफ्टनंट जनरल सुचिंद्र यांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जवानांचा सन्मान करण्यात आला.

**<><><><>**

गाझामध्ये युद्धविराम घोषित करण्याच्या दृष्टीनं प्रयत्न करण्यासाठी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन आज इस्रायलची राजधानी तेल अवीव इथं पोहोचले. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये हमासनं इस्रायलवर हल्ला केल्यानंतर आत्तापर्यंत ब्लिंकन यांनी नऊ वेळा पश्चिम आशियाचा दौरा केला आहे. इस्रायल आणि हमास यांच्यात कैरो इथं सुरू असलेल्या चर्चेवर ते लक्ष ठेवतील. तसंच इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष आयजॅक हेरझॉग, प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू आणि संरक्षण मंत्री योआव गॅलंट यांचीही भेट ते घेतील.

**<><><><>**

रशियाच्या पूर्व किनाऱ्याला आज ७ रिक्टर क्षमतेच्या भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाचा केंद्रबिंदू पेट्रोपाव्लोवस्क- कामशाकी शहराच्या ४८ किलोमीटर खोलीवर होता. भूकंपाच्या केंद्रबिंदूपासून तीनशे किलोमीटरच्या भागात त्सुनामी येण्याचा इशारा अमेरिकेच्या हवामान खात्यानं दिला होता. मात्र नंतर विभागाने ही शक्यता नाकारली.

**<><><><>**

सिनसिनाटी खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज महिला एकेरीतली अग्रमानांकित इगा श्वियांतेक आणि पुरुष एकेरीत पहिल्या क्रमांकावर असलेला यानिक

सिनर हे दोघेही मैदानात उतरतील. पोलंडच्या इगासमोर बेलारूसची अरीना साबालेंकाचं आव्हान असेल, तर सिनरचा सामना जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्ह याच्याशी होईल.

***//<><><><><>//***